सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :- 1) आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30,33,34,41,व कलम 51
2) भारतीय साथरोग अधिनियम, 1897
3) मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.डीएमयु-2020/प्र.क्र.92/आव्यप्र-1, दि.09/05/2020
4) मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.डीएमयु-2020/प्र.क्र.92/आव्यप्र-1, दि.10/05/2020
5) या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष/109/2020, दिनांक 14/03/2020
6) या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. कक्ष/कोरोना/कावी/06/2020, दि.02/04/2020

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,
क्र.कक्ष/कोरोना विषाणू/1035/2020.
पुणे, दिनांक :- 11 /05/2020.

जिल्हाधिकारी पुणे

आदेश

**ज्या अर्थी**, आपत्ती व्यवस्थान कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकरी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

**ज्या अर्थी**, सद्यस्थितीत लॉकडाऊन मुळे परराज्यात व महाराष्ट्रातील विविध जिल्हयात अडकलेल्या स्थलांतरित मजूर व इतर नागरिक बस, रेल्वे तसेच खाजगी वाहनाने प्रवास करुन पुणे जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागात दाखल होत आहेत. त्यामुळे कोरोना विषाणुचे संशयित रुग्ण प्रवास करुन आलेल्या प्रवाशांमधून आढळ होण्याची शक्यता आहे. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणुच्या संसर्गात अधिक वाढ होवु न देता तात्काळ उपाय योजना आखणे आवश्यक आहे. तरी प्रवास करुन आलेल्या सर्व प्रवाशांची तालुक्यांच्या / गावांच्या सीमेवर वैद्यकीय तपासणी करणे अनिवार्य आहे. सदर संशयित रुग्णांमुळे आपत्तीजनक परिस्थिती उदभवु नये यासाठी पुर्वतयारी करणे अगत्याचे झाले आहे.

**त्या अर्थी मी नवल किशोर राम, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी,** पुणे जिल्हयात आपत्ती व्यवस्थापन कायदा अन्वये सर्व उपविभागीय अधिकारी तथा Incident Commandar , तहसिलदार, गटविकास अधिकारी, पोलीस निरिक्षक, तालुका आरोग्य अधिकारी , मुख्याधिकारी यांना खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

1) पुणे जिल्हयात परराज्यातून व महाराष्ट्रातील विविध जिल्हयातून प्रवास करुन आलेल्या नागरिकांची तालुक्याच्या / गावाच्या सीमेवर चेकपोस्ट तयार करुन त्या ठिकाणी सर्व विभागांच्या संयुक्त पथकामार्फत तपासणी करण्यात यावी. तपासणी दरम्यान कोणतीही कोरोना विषाणूची लक्षणे नसल्यास संबंधितांच्या हातावर Home Quarantine असा शिक्का मारुन त्यांना Home Quarantine करण्यात यावे.
2) ज्या ठिकाणी प्रवास करुन आलेल्या नागरिकांना Home Quarantine करणे कौंटुबिक कारणाने शक्य नसल्यास अशा प्रवासी नागरिकांना Institutional Quarantine करण्यात यावे.
3) वैद्यकीय तपासणी दरम्यान कोरोना विषाणूची लक्षणे आढळल्यास संबंधित प्रवासी नागरिकांना कोव्हिड तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात यावे.
4) Home Quarantine करण्यात आलेल्या प्रवासी नागरिकांना घरगुती विलगीकरणा दरम्यान कोरोना विषाणूची लक्षणे आढळल्यास त्यांना तात्काळ कोव्हिड तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात यावे.
5) प्रवास करुन आलेल्या सर्व नागरिकांना विलगीकरणा दरम्यान आरोग्यविषयक सर्व काळजी घेण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.
6) उपरोक्त या कार्यालयाकडील आदेश व परिपत्रक वाचा क्र.5 व 6 प्रमाणे देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सोबत प्रत जोडली आहे.
7) पुणे जिल्हयातील सर्व तालुक्यात प्रवास करुन आलेल्या नागरिकांची स्वंतत्ररित्या नोंद ठेवण्यात यावी. तालुक्यात आलेल्या नागरिकांची माहिती दररोज तालुक्यातील आरोग्य विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी.
8) सर्व माहिती नियंत्रण कक्षाला कळविणेत यावी.

Scanned by CamScanner

वरील प्रमाणे सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, पोलीस निरिक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, मुख्याधिकारी यांनी विषाणू संसर्गाच्या अनुषंगाने सर्वसाधारणपणे जबाबदारी देणेत आलेली आहे. तरी उपरोक्त आदेशाची सर्व विभागांच्या संयुक्त पथकामार्फत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. परराज्यातून व महाराष्ट्रातील विविध जिल्हयातून प्रवास करुन आलेला कोणताही प्रवासी चेक पोस्टवर नोंदणीशिवाय प्रवेश करणार नाही याची दक्षता घ्यावी. सर्व संबंधित यंत्रणा अधिकारी यांनी देण्यात आलेल्या जबाबदारीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच, नियुक्त अधिका-यांनी त्यांचे अधिनस्थ मनुष्यबळ व साधन सामुग्रीचा यथोचित वापर करुन त्यांना सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडावी.

जिल्हाधिकारी पुणे

( नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**प्रत:-** 1. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.
2. सर्व संबंधितांस

Scanned by CamScanner